नि.दि.दा.क्र.२५/२०१७
गणेश वि. हौसाबाई

निशाणी क्र.५५ वरील आदेश

प्रतिवादी क्र.४ यांनी सदरचा अर्ज त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द वाटप होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.४ यांना दावा समन्स/नोटीसची बजावणी होवुन देखील प्रतिवादी हे न्यायालयात हजर न झाल्याने त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.४ यांना कायदेशीर बाबींचे ज्ञान नाही. प्रतिवादी क्र.४ हे नोकरीनिमित्त मुंबई येथे असल्यामुळे व दरम्यानच्या काळात आजारी असल्यामुळे वेळेत न्यायालयात हजर राहु शकलेले नाहीत. सदर दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होण्यासाठी प्रतिवादीची दाव्याची कैफियत याकामी दाखल करणे योग्य व न्यायाचे होणार आहे. प्रतिवादीला तशी संधी न दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. प्रतिवादीस दाव्याची कैफियत देण्याची संधी दिल्यास उभयपक्षाचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा अंतिम निर्णय गुणदोषावर होणार आहे. प्रतिवादीचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादीने म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर नाकारला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील कारण योग्य व संयुक्तीक नाही. कायदयातील तरतुद पाहता अर्ज व मागणी रद्द होण्यास पात्र आहे.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटप, होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.४ यांच्यावर निशाणी १९ प्रमाणे दिनांक १२.०६.२०१७ रोजी नोटीसची बजावणी करण्यात आली आहे. परंतु ते गैरहजर राहिल्याने त्यांच्या विरुध्द दिनांक १२.०७.२०१७ रोजी दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.४ यांनी हजर होवुन दिनांक २८.११.२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास ८ वर्षांपेक्षा जास्त कालावधी उशीर झाला आहे.

५. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी क्र.४ यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द होणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफीयत रेकॉर्डवर घेणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या दीर्घ विलंबाबाबत प्रतिवादी यांनी वादी यास खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.५५) रक्कम रुपये २०००/- (रक्कम रुपये दोन हजार फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येतो. सदरची रक्कम वादींना देण्यात यावी.

२. प्रतिवादी क्र.४ यांनी वरील पुर्तता केल्यानंतर त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांची कैफीयत रेकॉर्डवर घेण्यात येते.

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.28 17:54:21 +0530

स्थळ : वाई
दिनांक : २८/११/२०२५

(आर.एम.भेंडे)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर वाई.